INSPIRATION : D.D.GAWARE, SAHEB, Additional, S.P. Anti Corruption Bureau, (Retd), Maharashtra State
www.crimeborder.com ★Year 12 ★Issue 11 ★Pages - 6 ★KalyanmDist Thane, 01 To 15 September 2022 ★ Price 5.00 /-

पोलीस व गुन्हेगारी जगताची बित्तंबातमी देणारे
# क्राईम बॉर्डर

R.N.I. No. : MAHBIL/2010/41122 Mob- 9619630035

गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा!
: शुभेच्छुक :
क्राईम बॉर्डर, परीवार डोंबिवली



★ वर्ष : १२ ★ अंक : ११ ★ पाने : ६ ★ कल्याण, जि. ठाणे, ★ ०१ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०२२ ★ मूल्य : रु ५.००/- नोंदणी क्र.एमएएचबीआयएल/२०१०/४११२२

## शिवाजीनगर पोलीस स्टेशन अंबरनाथ व क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन (एनजीओ) च्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप व प्रोबोधन कार्यक्रम संपन्न!

**क्राईम बॉर्डर यूज नेटवर्क**

**डोंबिवली** : स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव ,घरोघरी तिरंगा या अभियाना अंतर्गत क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन, (एनजीओ) या सामाजिक संस्थेमार्फत विविध ठिकाणी कार्यक्रमा संपन्न होत असून क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन (एनजीओ) व शिवाजीनगर पोलीस स्टेशन अंबरनाथ च्या संयुक्त विद्यमाने अंबरनाथ तालुक्यातील अनुराग सेवा मंडळाच्या अनुराग मुलींचे वस्तीगृह या ठिकाणी विद्यार्थिनींसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी सर्व विद्यार्थिनींना अनुराग संस्थेच्या सभागृहात शालेय साहित्याचे वाटप कार्यक्रमाचे अध्यक्ष स.पो.निरी. जयेंद्र भोयर, कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी क्राईम बॉर्डर चे पुणे विभागीय निवासी संपादक नितीन सैद,कार्यक्रमाचे स्वागता ध्यक्ष रमेश काठे व अतिथी यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थिनींना शिक्षणाचे महत्व,व्यसनाधीनता यावर स.पो.निरी. सुप्रिया देशमुख यांचे व्याख्यान संपन्न झाले. क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसि एशन (एनजीओ) चे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र वखरे यांनी आपली प्रस्तावना मांडताना विद्यार्थ्यांना आपण मदत नव्हे,तर त्यांना शालेय साहित्य देणे हे आमचे कर्तव्य समजतो असे सांगून 'बेटी बचाव बेटी पढाव' विद्यार्थिनींनी मागे न येता आपल्या कर्तृत्वाच्या व बुद्धिमत्तेच्या जोरावर यश संपादन करून समाजासाठी व देशासाठी एक सुज्ञ नागरिक बना असे सांगितले. अनुराग सेवा मंडळाचे उल्लेखनीय कार्य गेल्या २६ वर्षापासून संस्था विद्यार्थ्यांसाठी घेत असलेली मेहनत व त्यांच्यासाठी विविध सुविधा पुरवीत असल्याबद्दल शाळेच्या ट्रस्टी व प्रिन्सिपल डॉ.ईला पॉल यांचे व शिक्षक वृद्धांचे त्यांनी कौतुक केले. तर आपल्या महान देशाच्या महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, मा.प्रतिभाताई पाटील स्वर्गीय पंतप्रधान इंदिरा गांधी अशा या अनेक यशस्वी महिला बद्दल सांगून विविध क्षेत्रात महिला आघाडीवर असल्याचे त्यांनी सांगितले. पो.निरी.लक्ष्मण कांबळे यांनी घरोघरी तिरंगा व देशाबद्दलची आपली निष्ठा, आपले कर्तव्य सांगून विद्यार्थ्यांनी खूप शिकून मोठे व्हा.हा संदेश दिला. रोटरी क्लब ऑफ विनर्स डोंबिवलीचे अध्यक्ष निलेश सोनवणे यांनी गरिबीतून मार्ग काढत संकटावर मात देऊन यश प्राप्त करा असे मनोगत व्यक्त केले.

कोकण वसाहत कल्याण (पश्चिम) चे शिवसेना शाखाप्रमुख गणेश कोते यांनी विद्यार्थिनींना व संस्थेला मिलिटरी, नेव्ही, पोलीस भरती याबद्दल मार्गदर्शन करून भविष्यात मदत करण्याचे आश्वासन दिले तर ज्येष्ठ शिवसैनिक वसंत खापरे यांनी क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन च्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढून काही मदत लागल्यास आम्ही करू असे आश्वासन दिले.रोटरी क्लब ऑफ विनर्स डोंबिवलीचे मेंबर बॉबी पिंटो यांनी महिला कशातही मागे नसून महिला वर्ग सदैव पुढे होता, आहे, व राहील असे सांगत झाशीच्या राणीचे कर्तुत्व सांगून महिलांचा इतिहास उलगडला. अनुराग मुलींच्या वस्तीगृहाच्या प्रिन्सिपॉल डॉ.ईला पॉल यांनी संस्था कशा प्रकारे काम करते व विद्यार्थ्यांना मदत करते हे सांगून सुरुवातीला खूप त्रास झाला पण विद्यार्थी घडवून आनंद वाटतो गेल्या २६ वर्षात अनेक मुलं व मुली या वस्तीगृहातून शिकून मोठ्या झाल्याचे त्यांनी सांगितले. स.पो.निरी.सुप्रिया देशमुख यांनी मुलींना मार्गदर्शन करताना गुड टच व बॅड टच याबद्दल सांगून चांगला स्पर्श व वाईट स्पर्श कसा ओळखावा याबद्दल माहिती दिली. उर्वरीत पान नं.२ वर...





## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप - शिक्षण काळाची गरज - सपोनि. जयेंद्र भोयर

**क्राईम बॉर्डर यूज नेटवर्क**

**डोंबिवली** : यावर्षी आपल्या भारत देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून आजादी का महोत्सव या कार्यक्रमाचे संपूर्ण देशभर आयोजन करण्यात आलेले आहे. स्वातंत्र्याचा महोत्सवा या निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन विविध ठिकाणी सुरू आहेत.स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आदिवासी दिनानिमित्त अंबरनाथ तालुक्यातील बोहोनोली गावातील जिल्हा परिषदच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शालेय साहित्याचे वाटप शिवाजीनगर पोलीस स्टेशन व क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन (एनजीओ) च्या संयुक्त विद्यमाने वाटप करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी स. पो.निरी. जयेंद्र भोयर हे होते, तर प्रमुख पाहुण्या म्हणून आश्रय महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ . सीमा वखरे उपस्थित होत्या.

व्यासपीठावर एपीआय सुप्रिया देशमुख , जावेद शहा , क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन (एनजीओ) चे संस्थापक राजेंद्र वखरे,जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका वैदेही देशमुख,पत्रकार सोनाली झोडगे उपस्थित होते.या कार्यक्रमाल विद्यार्थी मोठ्या संख्येने जमले होते. त्याचबरोबर गावातील ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थही उपस्थित होते.यावेळी राजेंद्र वखरे यांनी आदिवासी वरील जीवनपट उलगडून दाखविला.तर हर घर तिरंगा , आजादी का अमृत महोत्सव याचे विश्लेषण आश्रय महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ.सीमा वखरे यांनी केले. तर भारताच्या पंधराव्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु यांची माहिती शब्द रूपातून पत्रकार सोनाली झोडगे यांनी करून दिली.त्याचबरोबर स. पो. निरी.सुप्रिया देशमुख यांनी मुलांना व मुलींना गुड टच व बॅड टच ,शिक्षण व व्यसन याबाबत विद्यार्थ्यांसह उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.





या निमित्ताने व सालाबादा प्रमाणे दि.९ ऑगस्ट रोजी विश्व आदिवासी दिन व क्रांतीदिनाचे औचित्य साधून शिवाजी नगर पोलीस स्टेशन अंबरनाथ (पू.) व क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन (एनजीओ) च्या संयुक्त विद्यमाने सर्वप्रथम शिवाजी नगर पोलीस ठाण्यात आदिवासी दिन साजरा करण्यात आला. यावेळी व.पो. निरी. मधुकर भोगे पो. निरी. कांबळे एपीआय जयेंद्र भोयर, सुप्रिया देशमुख, जावेद शहा, आश्रय महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ.सीमा वखरे, संपादक राजेंद्र वखरे,पत्रकार सोनाली झोडगे व पोलीस अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेवटी अध्यक्षीय भाषणात एपीआय जयेंद्र भोयर यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना कुणीही लहान नाही व कुणीही मोठा नाही. जो तो आपापल्या बुद्धीच्या जोरावर मोठा होत असतो. प्रत्येकाने आपण कुठे जन्मलो याचा विचार करण्यापेक्षा आपण उच्च शिक्षण घेऊन प्रशासनात कसे जाऊ व आपल्या कुटुंबाचे व देशाचे हित कसे जोपासू यावर मार्गदर्शन केले. त्यांनी आदिवासी समाजातील पालकांनी मुलांना खूप उर्वरीत पान नं.३ वर...

## सामाजिक कार्यासाठी दात्यांनी पुढे येण्याची गरज : राजेंद्र वखरे

### क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन (एनजीओ) व श्री क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबीर संपन्न

**क्राईम बॉर्डर यूज नेटवर्क**

**डोंबिवली** : क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन (एनजीओ) व श्री क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने डोंबिवली पश्चिम येथील नागरिकांसाठी मोफत वैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या धकाधकीच्या दैनंदिनी मध्ये व प्रदूषणामुळे मुंबईतील जनजीवन विचित्र झाले असून शुद्ध हवा नसल्याने तसेच आरोग्यासाठी पौष्टिक जेवण नसल्यामुळे, ताणतणावाचा जीवन मानावर खूप मोठा परिणाम होत असून यातून मानवाला अनेक समस्यांनी घेरले आहे. अधिक श्रम ,घरगुती व कामाच्या ठिकाणी कामाचा ताण तणाव,लोकल प्रवास यामुळे अनेकांना बीपी, शुगर, छातीचे दुखणे याचा त्रास जाणवत आहे. हे ओळखून क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र वखरे यांनी श्री क्लिनिकचे संचालक डॉ.सुहास शिंत्रे यांच्याशी संपर्क साधून या विभागातील नागरिकां साठी मोफत आरोग्य उर्वरीत पान नं.४ वर...

## श्री ॐ सिद्धिविनायक वृद्धाश्रमास सामाजिक बांधिलकतून दिले गृहपयोगी साहित्य

**क्राईम बॉर्डर यूज नेटवर्क**

**अंबरनाथ** : क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन (एनजीओ) सामाजिक संस्था आपले सामाजिक उत्तरदायित्व पार पाडत असताना अंबरनाथ येथे मागच्या वर्षी सुरु झालेले वृद्धांसाठी कुठल्याही प्रकारचे शुल्क न आकारता वृद्धांची काळजी घेणारे श्री ॐ सिद्धिविनायक फाउंडेशनचे वृद्धाश्रम कार्यरत असल्याचे समजले असता



या ठिकाणी अंबरनाथ शिवाजी पोलीस स्टेशन चे स.पो.निरी.जयेंद्र भोयर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.शि. दादासाहेब वाघमारे व पो.ना.कैलास पारधी, निलेश सांगळे यांच्या मदतीने उर्वरीत पान नं.३ वर...

# शिवाजीनगर पोलीस स्टेशन अंबरनाथ व क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन (एनजीओ)च्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

पान नं. १ वरुन... तसेच संकटकाळी ११२ नंबर व १००नंबर याचा वापर कसा करावा याबद्दल विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स. पो. निरी. जयेंद्र भोयर यांनी विद्यार्थी वर्गाला मार्गदर्शन करतांना वाईट परिस्थितीला कधीही घाबरू नका ,आलेल्या संकटाला तोंड द्या, कुठल्याही परिस्थितीत शिका व शिकून आपले व आई वडिलांचे, शाळेचे नाव रोशन करून या देशाचे एक चांगले नागरिक बना असा संदेश देत अनुराग वस्तीगृहाचे कौतुक केले. कार्यक्रमाला शिवाजी नगर पोलीस स्टेशनचे पो.निरी. लक्ष्मण कांबळे,ए.पी.आय.जयेंद्र भोयर, क्राईम बॉर्डर चे पुणे विभागीय निवासी संपादक नितीन सैद, एपीआय सुप्रिया देशमुख, पो.उप.नि. तुळशीराम सावंत, अनुराग सेवा मंडळा च्या ट्रस्टी व मुलींच्या वस्तीगृहाच्या प्रिन्सिपल डॉ.ईला पॉल , क्राईम बॉर्डरच्या पुणे जिल्हा प्रतिनिधी चित्रा उर्फ (श्रावणी) कामत, क्राईम बॉर्डर चे पत्रकार व उद्योगपती रमेश काठे, क्राईम बॉर्डर चे पत्रकार फकिरबा नेव्हार, शिवसेना शाखाप्रमुख कोकण वसाहत कल्याण (पश्चिम) चे गणेश कोते, ज्येष्ठ शिवसैनिक वसंत खापरे, क्राईम बॉर्डर चे पत्रकार मुकेश म्हात्रे, रोटरी क्लब ऑफ विनर्स डोंबिवली शाखेचे प्रेसिडेंट निलेश सोनवणे, रोटरी क्लब ऑफ विनर्स डोंबिवली शाखेचे मेंबर बॉबी पिंटो, क्राईम बॉर्डरचे पत्रकार संतोष कोलंबकर आश्रय महिला संस्थेच्या अध्यक्षा व श्री स्वामी सखा (मैगझिन) च्या संपादिका सौ.सीमा वखरे, क्राईम बॉर्डरच्या रिपोर्टर व आदर्श चॅरिटेबल ट्रस्टच्या संचालिका सोनाली झोडगे, शिवाजीनगर पोलीस स्टेशन गोपनीय शाखेचे ए.एस. पाटील, पोलीस शिपाई कैलास पारधी अनुराग वस्तीगृहाच्या /शाळेच्या मुख्याध्यापिका वि.खंडागळे मॅडम, शिक्षकवृंद सुजाता सोनवणे, भंडारी सर, रूथ लोखंडे, राजेश सर प्रतिभा सिंग, फुलपगार सर व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची संकल्पना राजेंद्र वखरे व एपीआय जयेंद्र भोयर व सौ.सीमा वखरे यांची होती.

★★★


























# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव ,विश्व आदिवासी दिन ,क्रांती दिनाचे औचित्य साधून आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

पान नं. १ वरुन...शिकविण्याचे आवाहन केले.यावेळी विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप व्यासपीठावरील अध्यक्ष व प्रमुख पाहुणे व शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे अधिकारी व गावातील जेष्ठ नागरिक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एपीआय जयेंद्र भोयर, ए.पी.आय सुप्रिया देशमुख ,ए.पी.आय. जावेद शहा, पो. हवा. धांडे, पो. ना. भुसारे,पो.शि. दादासाहेब वाघमारे,बोहोनोली गावचे पोलीस पाटील बाळाराम उघडे, ग्रामपंचायत सदस्य बबन उघडे,ज्येष्ठ नागरिक काशिनाथ हंबीर,भरत निरगुडे व ग्रामस्थतसेच आश्रय महिला संस्था, कल्याणच्या अध्यक्षा सौ.सीमा वखरे,पत्रकार व आदर्श चॅरिटेबल ट्रस्टच्या पदाधिकारी सोनाली झोडगे,अंगणवाडी सेविका देविका उघडे,क्राईम बॉर्डर चे संपादक तथा क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र वखरे व आदि उपस्थित होते. आजादी का अमृत महोत्सवा निमित्त अंबरनाथ तालुक्यातील विविध चार ठिकाणी व कल्याण तालुक्यातील ग्रामीण भागातील चार ठिकाणी शालेय साहित्य वाटप करण्यात येणार आहे. क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन हि शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी संस्था गेल्या ९ वर्षांपासून क्राईम बॉर्डर व पोलीस यांच्या माध्यमातून काम करीत आहे या कार्यक्रमासाठी बोहोनोली गावचे पोलीस पाटील बाळाराम उघडे व जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका वैदेही देशमुख यांचे विशेष सहकार्य लाभले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन राजेंद्र वखरे यांनी केले. ★★★
















# श्री ॐ सिद्धिविनायक वृद्धाश्रमास सामाजिक बांधिलकतून दिले गृहपयोगी साहित्य

पान नं. १ वरुन... अंबरनाथ परिसरा तील वृद्धाश्रम, अनाथालय यांना (आजी),लक्ष्मी (आजी) व वृद्धाश्रमातील आजी यांना सुपूर्द करून सामाजिक म्हात्रे, सोनाली झोडगे,फकीरबा नेव्हार,संतोष कोलंबकर



राजेंद्र वखरे यांनी भेट दिली असता श्री ॐ सिद्धि विनायक वृद्धाश्रमास साहित्याची व मदतीची गरज असल्याचे ओळखून (सी. आर.डब्ल्यू.ए) एनजीओ तर्फे वृद्ध आजी आजोबांना जेवणासाठी लागणारे ताट (भांडी) स.पो.नि.जयेंद्र भोयर यांच्या हस्ते वृद्धाश्रमाच्या संचालिका विजया लक्ष्मी बसनगार,बनश्री बिश्वास,देवकी चववादी बांधिलकी जपली.

यावेळी अंबरनाथ शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पो.उप.निरी.तुळशीराम सावंत, पो.शि. दादासाहेब वाघमारे,पो.ना.कैलास पारधी, पो.ना. निलेश सांगळे, यांच्यासह फणसीपाडा येथील समाजसेवक विलास खरे व एनजीओ तर्फे सौ.सीमा वखरे, नितीन सैद, सौ.चित्रा कामत, रमेश काठे,मुकेश आदि उपस्थित होते.

क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन (एनजीओ) ही सामाजिक संस्था महाराष्ट्रातील विविध सामाजिक संस्था वृद्धाश्रम अनाथालय व आदिवासी विद्यार्थ्यांसाठी कार्य करीत असून या संस्थेला १ २ ए, ८०जी, प्राप्त असून देणगीदार यांना आयकरात ५०टक्के सूट मिळते.

★★★

# महाराष्ट्र जनरल मजदूर संघटनेच्या दहीहंडीचा कार्यक्रम उत्साहात संपन्न

**क्राईम बॉर्डर यूज नेटवर्क**

**डोंबिवली** : डोंबिवली स्टेशन पाटकर रोड कामत मेडिकल समोर लादी नाका डोंबिवली (पुर्व) , या ठिकाणी महाराष्ट्र जनरल मजदूर संघटने च्या वतीने नुकताच गोपाळ काला व दहीहंडीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या कार्य क्रमासाठी साठी अतिथी डोंबिवली शहर प्रमुख राजेश मोरे,उद्योगपती रवि शेट्टी,गजानन व्यापारी, सौ. सुलेखा गटकळ,संघटनेचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण मिसाळ अंकुर सामाजिक संस्थाच्या सौ.अक्षता भोसले उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी तेसाठी डोंबिवली शहर युवा अध्यक्ष नामदेव भानुसे, खजिनदार विश्वनाथ रेवगडे,सह खाजिनदार काकासाहेब मिसाळ, डोंबिवली शहर नाका अध्यक्ष रामेश्वर शेजुळ, केशव मिसाळ, योगेश ठोंबरे, कल्याण तालुका युवा अध्यक्ष सौ मनिषाताई सुर्वे, पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले. दहिहंडीला सलामी देण्यासाठी एकुण २१ गोविंदा पथकांनी उपस्थित दर्शविली सर्व गोविंदा पथकाचे पुष्प गुच्छ शाल श्रीफळ यथोचित सन्मान करण्यात आला. तर यावेळी एस. एल. बॉय गोविंदा पथकांने दहिहंडी फोडण्याचा मन मिळविला . नाका कामगार व डोंबिवली तील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ★★



# महाराष्ट्र जनरल मजदूर संघटनेच्या वतीने ७५ वा अमृतमहोत्सव साजरा

**क्राईम बॉर्डर यूज नेटवर्क** **डोंबिवली** : येथे घरोघरी तिरंगा अभियानांत गत १५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहणाचा कार्यक्रम पाटकर रोड कामत मेडिकल समोर लादीनाका येथे मोठ्या आनंदाने व उत्साहात साजरा करण्यात आला.ध्वजारोहण डोंबिवली विभागाचे एसीपी सुनिल कुराडे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

यावेळी शासकीय अधिकारी डोंबिवली रामनगर पो.स्टे.चे वपोनिरी. सचिन सांडभोर,टिळकनगर पोलीस स्टेशन चे वपोनिरी.अजय आफळे,मानपाडा पो.स्टे.चे वपोनिरी.शेखर बागडे, विष्णूनगर पो.स्टे.चे वपोनिरी. पंढरीनाथ भालेराव साहेब डोंबिवली वाहतूक शाखेचे वपोनिरी. उमेश गिते ,शिवसेना जिल्हा उपप्रमुख राजेश कदम न्यु फोर्स अकॅडमी चे संचालक शेख सर,रनर स्कॅन ग्रुपचे संचालक, लक्ष्मण गुडप माणिक उघडे,रिपब्लिकन पार्टीचे नेते अजय पौळकर कॉंग्रेस पार्टीचे नेते श्री. गणेश चौधरी, सौ.सुलेखा गटकळ व सौ.मनिषा सुर्वे ताई, हिरकनी महीला ग्रूप व उपस्थित सर्व भगिनी वर्ग व सर्व नाका कामगार बंधु भगिनी व मान्यवर



यांच्या सर्वांच्या उपस्थिती व सघटनेचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण माणिकराव मिसाळ, नामदेव भानुसे ,युवा अध्यक्ष रामेश्वर शेजुळ, नाका अध्यक्ष राणा शेठ, कल्याण जिल्हा कार्याध्यक्ष केशव मिसाळ, युवा अध्यक्ष डोंबिवली,सौ. वंदना जाधव महीला डोंबिवली शहर अध्यक्ष नवनाथ मोरे, डोंबिवली शहर अध्यक्ष या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ह भ.प.रामेश्वर काळे यांनी केले. या कार्यक्रमात विविध सामाजिक संस्थेचे अध्यक्ष राजकीय पक्षाचे नेते, कार्यकर्ते,पत्रकार बांधव पोलीस अधिकारी कर्मचारी व संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्वांच्या सहभागाने संघटनेचा कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे याही वर्षी यशस्वीरित्या संपन्न केल्या बद्दल संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मण मिसाळ यांनी सर्वांचे मन:पूर्वक आभार मानले.★★★

# सामाजिक कार्यासाठी दात्यांनी पुढे येण्याची गरज : राजेंद्र वखरे

## क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन (एनजीओ) व श्री क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबीर संपन्न

पान नं. १ वरुन... शिबिराचे आयोजन केले होते.यामध्ये नागरिकांची इसीजी,बीपी,शुगर याची मोफत तपासणी करण्यात आली या शिबिराचा अनेक लोकांनी लाभ घेतला.या शिबिराचे उद्‌घाटन प्रसिद्ध अभिनेते व रात्रीस खेळ चाले जिवाची होतिया काहिली या मालिकेतून अवघ्या महाराष्ट्राला प्रचलित असलेले नाथा उर्फ विकास थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. अभिनेते विकास थोरात यांनी त्यांच्या कोकणी मालवणी भाषेत देवाला गहाणे घातले कि,महाराजा या भारत देशातील सर्वांना निरोगी आयुष्य दे व बळीराजाला सुखी कर अन्नधान्य पिकू दे, निरोगी आरोग्य दे.यावेळी प्रस्तावनेत राजेंद्र वखरे यांनी सांगितले की,आमची सी.आर.डब्ल्यू.ए संस्था ही जन सामान्यांची संस्था असून संस्था सामाजिक,शैक्षणिक,वैद्यकीय,क्रिडा उपक्रम राबवित असते. प्रत्येकाने जर सामाजिक उपक्रमात सहभाग घेतला तर अनेक चांगले उपक्रम राबवता येतील यासाठी दात्याने पुढे येण्याची गरज आहे संस्थेला अधिक कार्य करता यावे यासाठी दानशूर लोकांनी पुढे येऊन आर्थिक मदत केल्यास जास्तीत जास्त समाज हिताचे कार्य करता येईल असे ते म्हणाले. शिबिरासाठी डॉ.सुहास शिंत्रे, डॉ. अर्चना शिंत्रे, सहयोगी नर्स सानिका लाड व प्रीती जाधव, यांनी नागरिकांची तपासणी केली. कार्यक्रमाला क्राईम बॉर्डर चे प्रबंध संपादक तथा सेंट झेवियर्स इंग्लिश हायस्कूलचे ट्रस्टी महेश भोईर व क्राईम बॉर्डर चे सहसंपादक व सेंट झेवियर्स इंग्लिश हायस्कूल चे ट्रस्टी संतोष भोईर तसेच सल्लागार व माजी नगरसेवक सोपानराव पाटील, सर अकॅडमीचे सर्वे सर्वा वीरचंद मैशेरी (सर),उद्योगपती तथा क्राईम बॉर्डर चे विशेष प्रतिनिधी रमेश काठे, उद्योगपती हिम्मत म्हात्रे, केशव पांडे, पत्रकार व आदर्श चॅरिटेबल ट्रस्ट च्या संपर्क प्रमुख सोनाली झोडगे, पत्रकार संतोष कोलंबकर,सत्यम वखरे, प्रशांत शिंत्रे, दिनकर सोमासे व सौ. पुष्पलता सोमासे, पत्रकार रवींद्र हरेर, रनर ग्रुपचे फाउंडर लक्ष्मण गुंडप, ज्येष्ठ समाज सेवक जितेंद्र अमोणकर,अॅड. महेश काळे व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कु. सई सोमासे हिने दोरी उड्या व ब्लॅक बेल्ट मध्ये उत्तुंग यश संपादन करून तिची नंदुरबार विभागीय संघात निवड झाल्याने तिचे विशेष अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजक डॉ. सुहास शिंत्रे व राजेंद्र वखरे तर संकल्पना सौ सीमा वखरे यांची होती.डॉ.सुहास शिंत्रे व सौ. अर्चना शिंत्रे तसेच क्राईम बॉर्डर परिवार यांच्या वतीने राजेंद्र वखरे सौ.सीमा वखरे यांच्या सामाजिक कार्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. ★★★





















Printed , Published, Owned & Editor - Rajendra Shrawan Vakhare, Printed at SIDDHAKALA PRINT MEDIA & PUBLICATIONS PVT. LTD., PLOT. No. W-230, TTC Industrial Area, Khairne MIDC, Navi Mumbai- Dist. Thane.MAHARAHTRA - 400710 Published From - Flat no 219, First Floor, L.I.G. Blg No 16, Opp- Birla College Chikanghar, Kokan Vasahat, Kalyan (w), Taluka - Kalyan, Dist- Thane. Pin Code- 421301- (Maharashtra) Mob. 09987496136,09619630035,08655004586 ( REGD.No.MAHBIL/2010/41122 Email - crimeborder@gmail.com Mob.9619630035

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री.राजेंद्र श्रावण वखरे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया,अ‍ॅण्ड पब्लिकेशन प्रा.लि.डब्ल्यू ,२३०, टीसीसी इंडस्ट्रियल एरिया खैरणे,एम आय डी सी , ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई ,जि. ठाणे -४००७१०, येथे छापून फ्लॅट नं. २१९, पहिला मजला, एल.आय.जी. बिल्डींग नं. १६, बिर्ला कॉलेज समोर, चिकणघर, कोकण वसाहत, कल्याण (प.), ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१३०१येथून प्रकाशित केले.(रजि.नं. एमएएचबीआयएल २०१०/४११२२) Email.crimeborder@gmail.com

## आई वडिलांना स्मरन न करता एकही दिवस जात नाही - डी. डी. गवारे, साहेब ॲडिशनल एस.पी. (एसीबी) से.नि.

**आठवण**

www.crimeborder.com

आज वडीलांच्या आठवणीसाठीचा दिवस, त्यानिमित्ताने पुन्हा पुन्हा (आई) वडीलांना साष्टांग नमस्कार,आई वडिलांना स्मरन न करता एकही दिवस जात नाही, आणि नमस्कार तर देवाबरोबर ही असतोच,मी देवाला माननारा आहेच पण , देवाबरोबर आई वडिलांना ही स्मरुन नमस्कार करत असतो,भलेही देवाबरोबर आई वडीलांना नमस्कार करने देवाला आवडत नसले तरी देवांची मी माफी मागतो,दर्जा मात्र मी देवासोबतच आई वडिलांना देणार. सन ५८-६0 चे दरम्यान माझा जन्म झाला असावा,कारण कामाचे व्यस्ततेमुळे मुळे बऱ्याच पालकाप्रमाणे माझ्याही जन्माची नोंद करने राहुन गेले, या ठिकाणी मी वडील अशिक्षित होते म्हणून नोंद झाली नाही असे मी म्हणणार नाही,कारण वडील चौथी शिकलेले होते, आणि रामचंद्र दहीफळे ,नांदुर नैबांदैत्य, सिताराम गर्जे रा.कोनोशी या पाथर्डी हे दोन शिक्षक फक्त चौथी शिकलेले होते, शिवाजी देशमुख आणि भानुदास काकडे अनुक्रमे रा.नांदुर नैंबादैत्य आणि सोनोशी ता.पाथर्डी हेच सातवी शिकलेले होते,म्हणजेच माझे वडीलही त्या काळात प्राथमिक शाळेत शिकवायला असलेल्या शिक्षकांचे इतके शिकलेले होते,पण कामाचे व्यस्तते मुळेच आमच्या जन्म तारखेच्या नोंदी झालेल्या नव्हत्या,किंवा खास अशी जनजागृती झालेली नव्हती असेच म्हणावे लागेल, किंवा याकामी असणारी यंत्रणा सक्षम नव्हती असेच म्हणावे लागेल,कारण १९२७ साली म्हणजे माझ्या जन्माचे अगोदर सूमारे ३०-३२ वर्षं अगोदर माझे वडीलांचे जन्म तारखेची नोंद आहे.

वडील नऊ दहा वर्षाचे होते तेव्हा पासुन वडीलोपार्जीत शेती करत होते, सर्व गैरसोयी असुनही बैल मेहनतीने कामे करत, पहाटे ४-५ वाजता उठुन रात्री न थांबता ८-९ वाजेपर्यंत कामे करायचे, आमच्या पालन पोषणासाठी स्वत:च्या पोटाला मारत असल्याचे उभे आयुष्य मी पाहीलेले आहे,जळालेली भाकरी तेच आवडीने खात असत,ती भाकर दुसऱ्यांना कधीही खाऊ दिली नाही .मी सहज एकदा जळालेली भाकरी आपण कोणीच खाल्ली नाही तर चालणार नाही का असे म्हणालो तेव्हा ही भाकरी भाजतांना तुझ्या आईचे हात भाजले तरी ती काहीही बोलत नाही, आणि ती भाकरी खाल्ली तर देव सतत भरपूर खायला देतो असे आम्हाला पटेल अशा भाषेत सांगायचे

कधीही विना ठिगळाचा सदरा व दंड न घातलेले धोतर त्यांनी घातले नव्हते,पण आम्हा भावंडांना वर्षातुन दोन वेळेस नविन कपडे ते घेत असत, कधीही अमुक एक खायला कर किंवा आज जेवायला काय कालवण (भाजी) आहे असे विचारले नाही,भाजी तिखट झाली की आळणी आहे कधीही ते म्हणाले नाही तर,आई परिस्थिती मुळे वडिलांना खुप बोलायची पण चकार शब्दही कधी वडील बोलले नाहीत, कोणाशीही भांडण केले नाही,शिवी त्यांचे तोंडुन मी ऐकलेली नाही, त्यांना गरीबी मुळे काही गावगुंडांनी फसवले पण जाब विचारला नाही.आई वडीलांचे गरीबी मुळे ज्या प्रवृत्तींनी त्यांचेवर अन्याय केले अशा प्रवृत्तींना मी मिळालेल्या संधीतुन अन्य गरीबाला अन्याय करणारांना मी मनापासून धडा शिकवला, वडील कधी काही शिकवत बसले नाही पण आम्ही त्यांचे क्रुतीतुन खुप काही शिकलो,अशा या माझ्या वडिलांना दैनंदिनीप्रमाणे खास सांष्टाग दंडवत.







D. D. Gaware
Additional S.P.(ACB). (Retd)

## माणसात देव शोधणारा पोलीसातील माणूस स.पो.नि. जयेंद्र भोयर

**- शोध व्यक्तिमत्वाचा**

www.crimeborder.com

: दि. ३१ ऑगस्ट २०२२ रोजी पोलीस तपासाच्या निमित्ताने बाहेरच्या राज्यात शिवाजीनगर पोलीस ठाणे अंबरनाथ पूर्व पोलीस स्टेशनचे अधिकारी स.पो. निरी.जयेंद्र भोयर, पो.हवा. साळुंके, पो.ना.काठे, पो.ना .कांबळे, पो.शि. दादासाहेब वाघमारे, पो.शि गडगे असे तपास कामी गेले होते . तपासादरम्यान मुक्काम करण्यासाठी एका हॉटेल थांबले होते . रात्री जेवण झाल्यानंतर शतपावली करण्यासाठी पो.हवा. साळुंके, पो.ना. काठे, पो.ना पो.ना कांबळे, पो.शि वाघमारे, पो.शि. गडगे असे रात्रीचे ११.०० वा.हॉटेलच्या बाहेर निघाले तेव्हा ते थांबलेल्या हॉटेलच्या बाहेर काही (२३ स्त्री/ पुरुष) लोक बसलेले दिसले. तेव्हा त्यांच्या सोबत असलेले पोलीस अंमलदार स्वामी यांनी त्यांची चौकशी केली. त्यावेळी त्यांनी त्यांचे मूळ गावी गोंदिया येथे चालले बाबत आणि त्यांची गाडी पंचर झाली असल्याचे सांगून थांबलेले असल्याबाबत सांगितले. त्यानंतर त्यांच्या लक्षात आले की हे बाहेर बसलेले लोक गोंदिया जिल्ह्यातील एका छोट्या गावातून रोजंदारी करण्यासाठी इकडे आले आहेत. आता त्याचं काम संपवून मिळालेला मोबदला घेऊन परतीचा प्रवास करीत आहेत.



याबाबत पथकाने सपोनि. जयेंद्र भोयर यांना कळविले ते तात्काळ हॉटेल मधून ज्या ठिकाणी लोकं बसली आहे त्या ठिकाणी आले. या लोकांना भोयर साहेब यांची ओळख करून दिली की भोयर साहेब तुमच्या जिल्ह्याचे आहेत ते आता ठाणे जिल्ह्यात मोठ्या पदावर पोलीस अधिकारी आहेत. बसलेल्या सर्व लोकांना भोयर साहेब म्हणाले की, तुम्ही माझ्या गावचे आहात, तुम्हाला काही अडचण असेल तर मला सांगा हे ऐकून त्या लोकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसू लागला. तेव्हा साहेबांनी त्यांना विचारले तुम्ही जेवण केले का ? हे ऐकल्यावर सर्वजण क्षणभर गंभीर झाले आणि थोडा वेळ काहीच न बोलता शांत बसले. त्यातील एकजण बोलला आम्हाला आज उपवास आहे. तेव्हा साहेबांच्या लक्षात आल की, हे सर्वजण उपाशी आहेत. तेव्हा साहेबांनी ते थांबलेल्या हॉटेलच्या मालकाला बोलावून या सर्वांसाठी जेवण बनवायला सांगितले.

त्यावेळी सर्वांचे चेहऱ्यावर समाधान दिसत होते.त्यातील एकजण बोलला की ,साहेब आम्ही इथेच बाहेर बसून जेवण करतो. तेव्हा भोयर साहेब बोलले की तुम्ही हॉटेल मध्ये येऊन निवांत बसून जेवण करा. हो-ना करता करता सर्वजण हॉटेल मध्ये आले पण आत येतांना पायातील चप्पल बाहेरच सोडल्या.सर्वांनी पोटभर जेवण केले,



स.पो. निरी.जयेंद्र भोयर

त्यानंतर साहेबांनी सर्वांसोबत मनसोक्त गप्पा मारल्या व ते सर्वजण भोयर साहेबांना म्हणाले कि साहेब गावी आल्यावर आम्हाला भेटायला या असे बोलून रात्री १२:३० वा. निरोप घेतला. साहेबांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसत होता तो म्हणजे आपुलकी आणि मनाच्या मोठेपणाचा

**- सुधीर गडगे**

# डोंबिवली विष्णूनगर पोलीसांची धडक कारवाई ,

## फसवणूक करणाऱ्या आरोपींना केले शिताफिने चतुर्भुज

**डोंबिवली (राजेंद्र वखरे ) :** कल्याण डोंबिवली परिसरामध्ये चैन स्नॅचिंग व ४२० च्या वाढत्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी वरिष्ठांनी कठोर तपासाचे आदेश दिले होते.

डोंबिवली विष्णुनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये अनोळखी भुरटे चोर, सराईत गुन्हेगार हे वयोवृद्ध आजी आजोबा यांना गोड बोलून चोऱ्यामाऱ्या व हात चलाखीने फसवत असल्याच्या काही घटना घडल्या होत्या.याची दखल घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरीनाथ भालेराव यांनी डिबीच्या अधिकाऱ्यांना धडक कारवाईचे आदेश दिले होते.

त्यादिवशी डोंबिवली पश्चिमेतील शास्त्रीनगर रुग्णालयातून एक आजी दवा उपचार करून आपल्या घरी येत असतांना तिला दोन अनोळखी इसमांनी थांबविले व त्यांची विचारपूस करून ते म्हणाले की, अहो !,आजी बाई तुम्हाला माहिती आहे का ?आमचे शेठ प्रकाश म्हात्रे हे गोरगरिबांना ११००/- रुपये व दोन साड्या सप्रेम भेट देत आहेत. तुम्ही पण आमच्या सोबत चला जवळच आहे , चला तुम्हाला सुद्धा ११००/- रुपये व दोन साड्या देतो असे गोड बोलून फसवून ते एका कोपऱ्यात घेऊन गेले आणि त्यांनी त्यांना बोलण्यात गुंतवून त्यांचे लक्ष विचलित करून त्यांच्याकडील एक लाख ९००/- रुपये किमतीची सोन्याची कंठी व रोख रक्कम फसवून घेऊन त्यांनी तेथून पोबारा केला.

थोड्या वेळानंतर त्या आजीच्या लक्षात आले की ,आपल्याला त्या दोघं भामट्यांनी फसविले आहे . पण आता त्यांची फसवणूक झालेली होती काय करावे हे त्यांना सुचत नव्हते म्हणून त्या सरळ विष्णुनगर पोलीस ठाण्यात आल्या आणि घडलेला प्रकार सांगितला असता त्यांच्या तक्रारीवरून गु. रजि. क्रं. २००/२०२२ भादवि.४२०,३४ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली.

आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत असे गंभीर प्रकार घडत असल्याची गंभीर दखल व.पो.निरी.पंढरीनाथ भालेराव यांनी घेऊन तात्काळ एक पथक तयार केले.

गुन्हे प्रकटीकरण विभागाचे पोलीस उपनिरीक्षक कुलदीप मोरे व पोलीस शिपाई कुंदन भामरे यांना तपास करण्याचे आदेश दिले .त्यानुसार मोरे व भामरे यांनी घटना ज्या ठिकाणी घडली ते ठिकाण पाहिले व त्या आजीकडून घटना कशी घडली ? कधी घडली ? आदी माहिती घेऊन तपास आरंभला. त्यांनी त्या परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्यांना दोन संशयित इसम डोंबिवली रेल्वे स्टेशन कडे जातांना दिसले म्हणून त्यांनी डोंबिवली लोहमार्ग पोलीसांची मदत घेऊन सीसीटीव्ही फुटेज तपासले त्यानुसार सदर व्यक्ती ह्या प्लॅटफॉर्म १ वरून टिटवाळ्याच्या दिशेने जातांनाच्या गाडीत चढताना दिसल्या. त्यानुसार त्यांनी टिटवाळा ,आंबिवली,शहाड या ठिकाणी जाऊन तपास केला असता तेथील फुटेज वरून सदर इसम हे आंबिवली येथे गेले असल्याचे त्यांना समजले परंतु आंबिवली या ठिकाणी पोलीस पथकाला सीसीटीव्ही फुटेज मिळाले नाही .

परंतु निराश न होता त्यांनी त्या विभागातील सर्व रिक्षा चालकांची भेट घेऊन अशा वर्णनाच्या व्यक्ती तुमच्या रिक्षातून कुठे गेल्या आहे का ? त्याचा तपास केला असता फुटेज मधील चेहरा बघून एक रिक्षावाला म्हणाला की साहेब हा तर माझ्या रिक्षामध्ये बसून बनेली पर्यंत गेला होता.

मग पोलीस पथक बनेली गावामध्ये गेले त्या ठिकाणी असलेल्या चौकात सीसीटीव्ही फुटेज नव्हते परंतु तेथील एका माजी नगरसेवकांच्या कार्यालयात जाऊन तेथील फुटेज पाहिले असता संशयित दोन इसम अर्ध्या तासाच्या अंतराने एका हॉटेलमधून बाहेर येतांना दिसले व पुन्हा ते एका रिक्षात बसून गेले परंतु कुठे गेले हे त्यांना समजून येत नव्हते .अशा या क्रिटिकल असलेल्या गुन्ह्यात पोलीसांनी सीसीटीव्ही मधील रिक्षाची ओळख पटवून त्या रिक्षा चालकाला माहिती विचारली असता त्याने त्या लोकांना कुठे सोडले ते ठिकाण दाखवले त्या ठिकाणी पोलीसांनी चौकशी केली असता त्यांना समजले की अशा प्रकारचे काही इसम व महिला त्या परिसरातील काही चाळीमध्ये राहायला आहे.फौजदार कुलदीप मोरे व पोलीस शिपाई कुंदन भामरे यांच्या चाणाक्ष नजरेने आरोपी हेरला. परंतु तोच इसम आहे का ? याची खात्री नव्हती तेवढ्यात रिक्षा चालक तिथून काहीतरी बहाना बनवून पळाला व फोनवरून तो म्हणाला की ,साहेब त्या घरात बसलेली व्यक्ती ही तीच संशयित व्यक्ती आहे. तुम्ही तिला पकडा आणि पोलीसांनी त्या चाळीच्या मालकाला बोलवले तो पर्यंत त्या घरातील काही महिला पळून गेल्या पण दोन इसमांना त्यांनी पकडले.

पोलीस उपनिरीक्षक कुलदीप मोरे व पोलीस शिपाई कुंदन भामरे यांनी जवळजवळ



५५ ते ६० सीसीटीव्ही फुटेज तपासून बनेली टिटवाळा या ठिकाणी रिक्षा चालक व स्थानिक रहिवासी यांच्या मदतीने आरोपी यांचे सीसीटीव्ही फुटेज दाखवून त्या आधारे कट्टू गणेश पवार वय ३५ वर्ष व राजेश शशीराव पवार व २७ वर्षे राहणार दोघेही पवार बंगल्याच्या जवळ शाहू यांची खोली रूम नंबर ६, बनेली गाव टिटवाळा जिल्हा ठाणे यांना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले.त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता ते सराईत गुन्हेगार असल्याचे उघड झाले. यापूर्वी त्यांच्यावर विष्णूनगर पोलीस ठाणे व मानपाडा पोलीस ठाणे या ठिकाणी अशाच प्रकारचे गुन्हे नोंद असल्याचे उघड झाले.सदर आरोपी हे सोलापूर साईटचे असून त्यांच्यावर विविध पोलीस ठाण्यात असेच गुन्हे नोंद असून यात काही महिलाही सहभागी आहेत त्यांचा पोलीस कसोशीने शोध घेत आहेत.

या गुन्ह्या संदर्भात कोणताही धागा दौरा हाती नसताना फक्त फुटेजच्या आधारे ५५ ते ६०सीसीटीव्ही फुटेज न कंटाळता तपासून पोलीस उपनिरीक्षक कुलदीप मोरे व पोलीस शिपाई कुंदन भामरे यांनी ही कामगिरी पार पाडली.

अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग कल्याण चे दत्तात्रय शिंदे ,डीसीपी परिमंडळ 3 चे सचिन गुंजाळ, एसीपी डोंबिवली विभागाचे संजय कुऱ्हाडे विष्णुनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरीनाथ भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कुलदीप मोरे सहायक पोलीस उपनिरीक्षक नाईकरे,पो.शि.कुंदन भामरे पाटणकर पोलीस हवालदार जमादार कुरणे पोलीस नाईक सांगळे लोखंडे तळवी यांनी परिश्रम घेतले.

★ ★ ★

# विरार गुन्हे शाखा कक्ष ३ ,ने राष्ट्रीय महामार्गावर दरोडा टाकणाऱ्या टोळीला शिताफीने केले जेरबंद


www.crimeborder.com

ठाणे : मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय हद्दीतील राष्ट्रीय महामार्गावर घडणाऱ्या गुन्ह्यांची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेऊन गुन्ह्यातील आरोपी यांचा शोध घेऊन प्रभावीपणे पायबंद करणेबाबत सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने दि. २७: ऑगस्ट रोजी तीन वाजून वीस मिनिट ते चार वाजून पंचवीस मिनिट वाजता च्या दरम्यान लेनिट एक्सपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड परमार इंडस्ट्रियल स्टेट वसई फाटा जवळ नालासोपारा पूर्व तालुका वसई जिल्हा पालघर येथे फिर्यादी नामे मनोज राणे वय 40 वर्ष धंदा नोकरी राहणार प्रेम वल्लभ हॉल जवळ आगाशी रोड विरार पश्चिम तालुका वसई जिल्हा पालघर यांचे लेणीत एक्सपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत आठ इसमानीं प्रवेश करून वाचमेन यांना मारहाण करून त्यांचे जबरदस्तीने हातपाय बांधून ठेवले.

त्यानंतर आयशर कंपनीचा टेम्पो गेटमध्ये घेऊन त्यात त्यांनी गोडाऊन मधील ठेवलेले स्टेनलीस स्टीलचे रोड किंमत तीन लाख ७८ हजार रुपये असा माल आयशर टेम्पोमध्ये भरून जबरी चोरी करून निघून गेले होते. त्याबाबत पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक ७२७ / 2022 भारतीय दंड विधान संहिता कलम 39५, 341 प्रमाणे अज्ञात आरोपीतांविरुद्ध दरोड्याचा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्यातील अज्ञात आरोपीतांचा शोध होण्याच्या अनुषंगाने पोलीस आयुक्त गुन्हे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सूचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष ३, विरारचे पोलीस पथकाने वेगवेगळे पथक तयार करून गुन्ह्यातील आरोपीत यांचा तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने माहिती प्राप्त करून गुन्हा घडल्याच्या 3६ तासाच्या आत सापळा रचून आरोपीत नामे १) बद्री आलम मेहमूद अली खान वय 3६ वर्ष , २) इर्शाद शौकत अली वय ५4 वर्ष , ३) मोहम्मद रफीक इद्रिस शहा 2७ वर्ष ,४) मोहम्मद रफीक शेख व ३७ वर्ष , ५) मजहर इरशाद अली खान 21 वर्ष , ६) नजीर अहमद सोराब अली शेख वय ४० वर्ष ,७) हाफिजउल्ला ईदउल्ला खान 29 वर्ष यांना शिताफीने ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडे प्राथमिक तपासात त्यांचा सदर गुन्ह्यात सक्रिय सहभाग निष्पन्न झाला असून ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीतांपैकी आरोपीत नामे बद्री आलम मेहबूब आलेख खान वय 3६ वर्ष याचे वर यापूर्वी नाशिक व ठाणे जिल्ह्यात अशाच प्रकारे गंभीर गुन्हे दाखल आहेत सदर आरोपीत यांना पकडणे कामी मुंबई पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखा कक्ष ६ चे पोलीस निरीक्षक रवींद्र साळुंखे यांचे पथकाने तात्काळ मदत पुरविली . वरील आरोपी यांनी अशाच प्रकारे आणखी गुन्हे केले आहेत. याबाबत अधिक तपास सुरू असून यांना पुढील कारवाई करिता पेल्हार पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

या गुन्ह्यासंदर्भात या गुन्ह्यासंदर्भात विजयकांत सागर , पोलीस उपयुक्त (मुख्यालय), अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे ,सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) मि . भा . वि . व. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पो. उप. निरी. शिवाजी खाडे ,उमेश भागवत ,पो. हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण ,मुकेश तटकरे, शंकर शिंदे ,सचिन घेरे, सागर बारवकर ,पोलीस नाईक , पो. शि . मनोज सकपाळ, राकेश पवार ,अश्विन पाटील ,सुमित जाधव सर्व नेमणूक गुन्हे शाखा कक्ष तीन यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

# बी.डी.डी. चाळीच्या पुनर्विकासांतर्गत पोलिसांना केवळ १५ लाख रुपयांमध्ये मालकी हक्काची घरे



मुंबई: बी.डी.डी. चाळीच्या पुनर्विकासांतर्गत पोलीसांना केवळ १५ लाख रुपयांमध्ये मालकी हक्काची घरे देण्याच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत केलेल्या घोषणेची तात्काळ अंमलबजावणी करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेनंतर अवघ्या पाच दिवसात याबाबतचा शासन निर्णय आज गृहनिर्माण विभागाने जाहीर केला आहे.

बी. डी. डी. चाळींमध्ये दि. १ जानेवारी २०११ पर्यंत वास्तव्यास असणाऱ्यांना बी. डी. डी. चाळींच्या पुनर्विकासांतर्गत ५०० चौ. फूट क्षेत्रफळाच्या पुनर्विकसित गाळ्याचे वितरण मालकी तत्त्वावर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

सेवेत कार्यरत, सेवानिवृत्त व दिवंगत पोलीस कर्मचाऱ्यांचे कायदेशीर वारस या बी.डी.डी. चाळीत वास्तव्यास असल्याने त्यांना परवडणाऱ्या किंमतीत घरे देण्याची आग्रही भूमिका मुख्यमंत्री श्री. शिंदे यांची होती.

नुकत्याच झालेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विधानसभेमध्ये दि. २५ ऑगस्ट रोजी अंतिम आठवडा प्रस्तावावर निवेदन करताना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी या घरांच्या किंमतीची घोषणा केली होती. पोलीसांकडून किंवा त्यांच्या वारसांकडून पुनर्विकसीत गाळ्याच्या बांधकाम खर्चाची रक्कम आकारण्यात येईल, असे सांगून फक्त १५ लाख रुपयांमध्ये हे घर देण्याचे जाहीर केले होते. मुख्यमंत्र्यांनी घोषणा केल्यानंतर अवघ्या पाच दिवसात गृहनिर्माण विभागाने या संदर्भातील शासन निर्णय जाहीर केला आहे.

वरळी, नायगांव व ना. म. जोशी मार्ग येथील पोलीस सेवानिवासस्थानाच्या बदल्यात कायमस्वरुपी देण्यात येणाऱ्या पुनर्विकसित सदनिकेसाठी आकारण्यात येणाऱ्या वरील बांधकाम खर्चामुळे म्हाडास होणारा तोटा पुनर्विकासानंतर प्राप्त होणाऱ्या शासनाच्या हिश ?श्यामधील म्हणजे शासन व म्हाडा ७०:३० टक्के नफ्यातून वर्ग करण्यात येईल, असेही शासन निर्णयात नमूद केले आहे.




# नायगावमध्ये बॅगेत सापडलेल्या तरुणीच्या मृतदेहाचे कोडे उलगडले


www.crimeborder.com

एका 1५ वर्षीय तरुणीचा मृतदेह बॅगेत सापडला या प्रकरणी ३०२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे. तसेच मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. अल्पवयीन मुलीच्या पोटावर धारदार शस्त्राने हल्ला करुन हा खून केल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे, असे वालीव पोलिसांनी सांगितले. तिची ओळख पटली आहे.

पालघर नायगाव पश्चिमेकडील उड्डाणपूलाच्या परिसरात असलेल्या झुडपात मृतदेह एका बॅगेत भरून टाकण्यात आला होता. वालीव पोलिसांनी आरोपीची ओळख पटवली आहे. पोलीस त्याच्या शोध घेत आहेत. नायगाव पश्चिमेकडील उड्डाणपूलाच्या खाली शुक्रवारी दुपारी एक प्रवासी बॅग आढळून आली. स्थानिकांनी पोलिसांना माहिती दिल्यानंतर पोलिसांनी बॅगेची तपासणी केली. या बॅगेत चादरीमध्ये एका १५ वर्षीय मुलीचा मृतदेह गुंडाळून टाकण्यात आला होता. तिच्या पोटावर धारदार शस्त्राने वार करून तिची हत्या करण्यात आली होती.

वालीव पोलिसांनी या मुलीची ओळख पटवली असून ती अंधेरी येथे राहणारी आहे. गुरूवारी ती बेपत्ता असल्याची तक्रार आल्यानंतर अंधोरी पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून तिचा शोध सुरू केला होता.मारेकरी ट्रेनमध्ये घेऊन आला मृतदेह प्रवासी बॅगेत मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही तपासून आरोपीची ओळख पटवली आहे. आरोपी लोकल ट्रेनमधून उतरून या ठिकाणी आल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत आहे. आम्ही आरोपीची ओळख पटवली असून लवकरच त्याला अटक करू अशी माहिती वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे यांनी दिली.

# महाराष्ट्र जनरल मजदूर संघटनेच्या वतीने ७५ वा अमृतमहोत्सव साजरा


www.crimeborder.com

डोंबिवली (रामेश्वर काळे) : घरोघरी तिरंगा अभियानांतर्गत १५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहणाचा कार्यक्रम पाटकर रोड कामत मेडिकल समोर लादीनाका डोंबिवली येथे मोठ्या आनंदाने व उत्साहात साजरा करण्यात आला.

ध्वजारोहण डोंबिवली विभागाचे एसीपी सुनिल कुराडे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.यावेळी शासकीय अधिकारी डोंबिवली रामनगर पो.स्टे.चे वपोनिरी. सचिन सांडभोर, टिळकनगर पो.स्टे.चे व.पो. निरी. अजय आफळे,मानपाडा पो.स्टे.चे व.पो.निरी.शेखर बागडे,विष्णूनगर पो.स्टे.चे वपोनिरी. पंढरीनाथ भालेराव ,डोंबिवली वाहतूक शाखेचे व.पो.निरी. उमेश गिते ,शिवसेना जिल्हा उपप्रमुख राजेश कदम,न्यु फोर्स अकॅडमी चे संचालक शेख सर,रनर स्कॅन ग्रुपचे संचालक लक्ष्मण गुंडप , माणिक उघडे,रिपब्लिकन पार्टीचे नेते अजय पौळकर,कॉंग्रेस पार्टीचे नेते श्री. गणेश चौधरी,सौ.सुलेखा गटकळ व सौ. मनिषा सुर्वे ताई, हिरकनी महीला ग्रूप व उपस्थित सर्व भगिनी वर्ग व सर्व नाका कामगार व मान्यवर व सघटनेचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण माणिकराव मिसाळ,नामदेव भानुसे,युवा अध्यक्ष रामेश्वर शेजुळ,नाका अध्यक्ष राणा शेठ, कल्याण जिल्हा कार्याध्यक्ष केशव मिसाळ,युवा अध्यक्ष डोंबिवली,सौ. वंदना जाधव महीला डोंबिवली शहर अध्यक्ष नवनाथ मोरे ,डोंबिवली शहर अध्यक्ष या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ह.भ.प. रामेश्वर काळे यांनी केले.

या कार्यक्रमात विविध सामाजिक संस्थेचे अध्यक्ष राजकीय पक्षाचे नेते, कार्यकर्ते,पत्रकार बांधव पोलीस अधिकारी कर्मचारी व संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वांच्या सहभागाने संघटनेचा कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे याही वर्षी यशस्वीरित्या संपन्न केल्या बद्दल संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मण मिसाळ यांनी सर्वांचे मन:पूर्वक आभार मानले.





